प्रकरण ५ वे

# सर्वोच्च न्यायालय

I) प्रस्तावना :-

कायद्याचा अर्थ लावणारी, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास दंड देणारी व न्यायदानाचे कार्य करणारी संस्था म्हणजे न्यायमंडळ होय. लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये न्यायमंडळाला विशेष महत्व असते. भारतामध्ये संपूर्ण देशासाठी एकच न्यायव्यवस्था निर्माण करून एकेरी न्यायव्यवस्थेचा स्विकार करण्यात आलेला आहे. भारताची न्यायव्यवस्था पिरॅमिड सारखी आहे. न्यायदानाच्या सर्वोच्च स्थानावर सर्वोच्च न्यायालय आहे. सर्वोच्च न्यायालय अंतिम व सर्वश्रेष्ठ न्यायालय आहे. सर्वोच्च न्यायालयाची स्थापना 26 जानेवारी 1950 ला झाली आहे. 1950 च्या अगोदर अंतिम न्यायालय म्हणून न्यायदान करण्याचा अधिकार इंग्लंडच्या प्रिव्हीकौन्सीलला होता. भारतीय संविधानाच्या 5 व्या व 6 व्या भागातील कलम 124 ते 146 आणी 214 ते 237 मध्ये न्यायव्यवस्थेचा विचार मांडण्यात आलेला आहे.

II) सर्वोच्च न्यायालयाची रचना :-

1) न्यायाधिशांची संख्या :-

सर्वोच्च न्यायालयामध्ये सध्या एक मुख्य न्यायाधिश व 25 इतर न्यायाधिश आहेत. आवश्यकतेनुसार इतर न्यायाधिशांची संख्या वाढवता येते.

2) न्यायाधिशांची नेमणूक

सर्वोच्च न्यायालयातील मुख्य व इतर न्यायाधिशांची नेमणूक करण्याचा अधिकार भारताच्या राष्ट्रपतीला आहे. शक्यतो सर्वोच्च न्याया

Scanned with CamScanner

त्यातील ज्येष्ठ न्यायाधिशालाच मुख्य न्यायाधिश पदावर नेमले जाते

3) न्यायाधिशाची पात्रता :-

i) तो भारताचा नागरीक असावा.

ii) त्याने कमीत कमी 5 वर्ष उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात न्यायाधिश म्हणून काम केले असावे

iii) त्याने उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात कमीत कमी 10 वर्ष वकिल म्हणून काम केला असावा

iv) राष्ट्रपतीच्या दृष्टिने तो कायदेपंडित असावा।

4) शपथविधी :-

सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशाला आपले पद स्विकारण्यापूर्वी राष्ट्रपती द्वारे शपथ दिली जाते.

5) कार्यकाल :-

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिश वयाच्या 65 वर्षापर्यंत तो कार्य करु शकतो.

6) राजीनामा :-

सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांना 65 वर्षाच्या अगोदर स्वइच्छेनुसार राष्ट्रपतीकडे आपल्या या पदाचा राजीनामा देता येतो.

7) पदच्युती / महाभियोग :-

सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांनी गंभीर स्वरुपाचा गुन्हा केल्यास त्याला महाभियोगाच्या खटल्याद्वारे पदच्यूत करण्याचा अधि-

Scanned with CamScanner

कार संसदेला आहे. संसदेच्या प्रत्येक सभागृहातील एकूण सभासद संख्येच्या बहुमताने व उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सभासदांच्या 2/3 बहुमताने महाभियोगाचा ठराव पास झाल्यास न्यायाधिशास पदच्युत केले जाते.

8) वेतन / भत्ते :-
सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांनी निपक्षपातीपणे व निर्भिडपणे कार्य करावे यासाठी त्यांना भरपूर वेतन व भत्ते व इतर सुखसोई दिल्या जातात. न्यायाधिशाचे वेतन ठरविण्याचा अधिकार संसदेला देण्यात आलेला आहे.

III सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार व कार्ये :-

1) प्रारंभिक अधिकार क्षेत्र :-
ज्या खटल्याच्या प्रारंभ सर्वोच्च न्यायालयामध्ये होतो. किंवा जे खटले सर्वप्रथम सर्वोच्च न्यायालयामध्ये चालविले जातात. त्यास प्रारंभिक अधिकार असे म्हणतात. त्यामध्ये

1) केंद्र सरकार व घटकराज्य सरकार यांच्यातील वाद दूर करणे.
2) दोन किंवा दोन पेक्षा जास्त घटकराज्यातील वाद दूर करणे.
3) नागरिकांच्या मुलभूत हक्काचे संरक्षण करणे. इ.

२) पूर्णनिर्णयाचे अधिकार :-

सर्वोच्च न्यायालयाला पूर्णनिर्णयाचा अधिकार ही देण्यात आलेला आहे. भारताने एकेरी न्यायव्यवस्थेचा स्विकार केला असल्यामुळे कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर पूर्नविचार करून परत निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. त्यास पूर्णनिर्णयाचा अधिकार असे म्हणतात.

३) सल्लाविषयक अधिकार :-

राष्ट्रपतीला कायदेविषयक सल्ला घेण्याची गरज पडल्यास तो सल्ला सर्वोच्च न्यायालयाकडून घेतला जातो. राष्ट्रपतीला सल्ला देणे हे सर्वोच्च न्यायालयावर बंधनकारक आहे. परंतू त्याने दिलेला सल्ला ऐकलाच पाहीजे असे बंधन राष्ट्रपतीवर नाही. १९९१ मध्ये कावेरी नदीच्या पाणी वाटपाच्या संदर्भात १९७५ च्या राष्ट्रपतीच्या निवडणूकीच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाला सल्ला मागितला होता.

४) मुलभूत हक्काचे संरक्षण करणे :-

भारतीय नागरिकांना कलम १२ ते ३५ नुसार जे मुलभूत अधिकार प्राप्त झाले आहेत त्याचे संरक्षण करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाचा आहे. मुलभूत हक्कावर आक्रमण आल्यास सर्वोच्च न्यायालयामध्ये कलम ३२ नुसार बंदीप्रत्यक्षीकरण, परमादेश, अधिकारपृच्छा, प्रतिबंध व उत्प्रेक्षण यांद्वारे अर्ज करता येतो.

Scanned with CamScanner

5) संविधानाचे संरक्षण करणे :-
राज्यघटनेचे संरक्षण करणे हा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार आहे. संविधानातील कलमाचा किंवा शब्दाचा अर्थलावणे. कायद्याची वैधता ठरविण्याचा अधिकार ही सर्वोच्च न्यायालयाचा आहे कायदेमंडळानी संविधानाच्या विरुद्ध कायदा केल्यास तो कायदा घटनाबाह्य ठरविण्याचा अधिकार ही सर्वोच्च न्यायालयाला आहे.

6) स्वनिर्णयावर पुर्नविचार करण्याचा अधिकार :-
भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला स्वतः नी दिलेल्या निर्णयावर पुर्नविचार करून परत निर्णय देण्याचा अधिकार आहे. कारण सर्वोच्च न्यायालय पूर्णनिर्णयाचे अंतिम व सर्वश्रेष्ठ न्यायालय आहे. क्वचित प्रसंगी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाकडूनहीचूक होऊ शकते. ती चूक दुरुस्त करणे न्यायाच्या दृष्टिने आवश्यक असते त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला स्वनिर्णयावर परत निर्णय देण्याचा अधिकार आहे.

7) अभिलेख न्यायालय :- सर्वोच्च न्यायालय हे अभिलेखाचे किंवा शाश्वत न्यायालय आहे. अभिलेख न्यायालयाचा आशय दोन प्रकारचा आहे.

i) न्यायालयाचा अपमान करणाऱ्यास हे न्यायालय स्वतः दंड किंवा शिक्षा करु शकते.

ii) अभिलेख न्यायालयाचा दुसरा आशय म्हणजे न्यायालयीन निर्णयाची काळजीपूर्वक नोंद ठेवली जाते

आणि नंतर उद्भवणाऱ्या तशाच स्वरूपाच्या खटल्यांच्या वेळी त्या निर्णयाच्या किंवा अभिलेखाच्या मार्गदर्शक किंवा साक्ष या माध्यमातून त्याचा स्विकार केला जातो. यासच अभिलेखाचे न्यायालय असे म्हणतात.

Imp 5 mark.

४) न्यायालयीन पुर्नविलोकनाचा अधिकार :-

१) प्रस्तावना :-

i) न्यायलयीन पुर्नविलोकन :- भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुर्नविलोकनाचा अधिकार आहे. भारताने या अधिकाराचा स्विकार अमेरिकेकडून केलेला आहे. अमेरिकेमध्ये या अधिकाराचा वापर सर्वप्रथम १८०३ मध्ये मार्बरी विरुद्ध मॅडिसन यांच्यात खटल्याचा किंवा केसचा निकाल देताना मुख्य न्यायाधिश मार्शल यांनी या अधिकाराचा सर्वप्रथम अवलंब केला. या अधिकाराला न्यायालयीन सिंहावलोकन या नावाने ओळखले जाते. लिखीत संविधानाचा स्विकार करणाऱ्या देशात हा अधिकार अतिशय महत्वाचा असतो. या अधिकारामुळे संविधानाचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. तसेच संविधानाचे संरक्षण करता येते.

ii) न्यायालयीन पूर्नविलोकनाचा अर्थ :- संसदेनी केलेला कायदा संविधानाच्या किंवा मुलभूत हक्काच्या विरुद्ध असेल तर तो कायदा रद्द करण्याचा करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास आहे या अधिकारास न्यायालयीन पूर्नविलोकनाचा अधिकार असे म्हणतात.

Scanned with CamScanner

किंवा एखादा कायदा संविधानाशी सुसंगत आहे किंवा नाही तेतपासून सुसंगत नसल्यास तो कायदा रद्द करण्याचा अधिकार न्यायालयास आहे. त्यास न्यायालयीन पुर्नविलोकन असे म्हणतात. [परंतू भारतीय संविधानाच्या कोणत्याही कलमात स्पष्टपणे न्यायालयीन पूर्नविलोकनाच्या उल्लेख करण्यात आलेला नाही. अमेरिकेच्या संविधानात मात्र त्याचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात आलेला आहे. इंग्लंडला न्यायालयीन पूर्नविलोकनाचा अधिकार नाही. त्यामुळे इंग्लंडमध्ये संसदेचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले आहे.] [पार्श्वभूमीमध्ये]

न्यायपंडित (Story) स्टोरी च्या मते :- अर्थ

"न्यायालयीन पूर्नविलोकन म्हणजे कायद्याचा घटनात्मक दृष्टिकोनातून लावणे व जे कायदे राज्यघटनेला अनुसरून नसतील ते कायदे घटनाबाह्य समजून रद्द करणे होय.

(iv) भारतातील न्यायालयीन पूर्नविलोकन :

1976 मध्ये 42 वी घटनादुरुस्ती करून हा अधिकार कमी करण्यात आला होता. परंतू 1978 मध्ये 43 व्या घटनादुरुस्तीनुसार हा अधिकार परत न्यायालयाला देण्यात आला. आजपर्यंत अनेक वेळा या अधिकाराचा वापर सर्वोच्च न्यायालयाद्वारे करण्यात आलेला आहे.

i) 1950 साली बिहारमधील जमिनसुधारणा कायदा अवैध ठरविला.

ii) 1950 साली प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेचा कायदा अवैध ठरविला.

iii) 1952 चा शंकरीप्रसाद विरुद्ध भारत सरकारचा वाद
iv) 1967 मधील गोलखनाथ विरुद्ध पंजाब सरकारचा वाद
v) 1973 साली केशवानंद भारती वाद याचा निर्णय देताना या अधिकाराचा वापर करण्यात आला.

V) न्यायालयीन पूर्णविलोकनाचे महत्व :-

न्यायालयीन पूर्णविलोकनाचा हा अधिकार अनेक कारणामुळे महत्वाचा आहे. न्यायालयीन पूर्णविलोकनामुळे
i) नागरिकांच्या मुलभूत हक्काचे संरक्षण होते.
ii) संविधानाशी सुसंगत कायद्याची निर्मिती होते.
iii) कायद्याचे / संविधानाचे श्रेष्ठत्व सिद्ध होते.
iv) संघराज्य शासनव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त होते. कायदे मंडळाद्वारे योग्य योगाच्या कायद्याची निर्मिती होते.
v) कायदेमंडळावर न्यायमंडळाचे नियंत्रण प्रस्थापित होते. इ. मुळे हा अधिकार महत्वाचा वाटतो.

* IV न्यायमंडळाची वैशिष्ट्ये :-
1) एकेरी न्यायव्यवस्था :-
2) न्यायालयाचे स्वातंत्र्य :-
3) पिरॅमिडसारखी न्यायव्यवस्था :-
4) न्यायालयीन निर्णय टिकाबाह्य :-
5) अंतिम व सर्वश्रेष्ठ न्यायालय :-
6) निपक्षपातीपणा व निर्भिडपणा :-
7) न्यायालयीन पूर्णविलोकन :-
8) न्यायालयीन सक्रियता :-

९) कार्यकालाची सुरक्षितता :-

१०) कायद्याचा व संविधानाचा अर्थ लावणे :-

३. अनेक वैशिष्ट्ये न्यायमंडळाची सांगता येतात.

★ ४ न्यायमंडळाचे स्वातंत्र्य :-

न्यायमंडळाचे स्वातंत्र्य म्हणजे कायदेमंडळ कार्यकारी मंडळाच्या हस्तक्षेपापासून किंवा नियंत्रणापासून वर्चस्वापासून मुक्त असणे होय. तसेच कायदेमंडळ व कार्यकारीमंडळाच्या निर्णयाला समाजातील कोणत्याही संस्थेच्या किंवा व्यक्तीच्या अभिमाला बळी न पडता निर्णय देणे होय. न्यायमंडळ शासनाच्या हस्तक्षेपापासून दूर असणे म्हणजे न्यायालयीन स्वातंत्र्य होय. न्यायमंडळाचे स्वातंत्र्य खालील घटकाच्या आधारावर दिसून येते.

i) न्यायधिशाची नेमणूक :-

न्यायाधिशाची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला असतो ही नेमणूक करताना सेवाजेष्ठतेचा विचार करुन अनुभवी कायदेपंडित असणाऱ्या व्यक्तीचीच नेमणूक करतो. यामुळे न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधित असते. न्यायधिशाची नेमणूक जर कायदेमंडळ, मंत्रीमंडळ किंवा जनतेतर्फे झाली असती तर त्यांच्या दबावाखाली न्यायधिशांना निर्णय द्यावे लागले असते. राष्ट्रपतीला न्यायधीशाची नेमणूक करण्याचा अधिकार असला तरीही पदच्युत करण्याचा अधिकार मात्र राष्ट्रपती कडे ठेवण्यात आलेला नाही.

ii) उच्च पात्रता :-

भारतीय संविधानामध्ये न्यायधिशाच्या पदासाठी ही पात्रता सांगण्यात आलेली आहे. त्यामुळे

न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधीत आहे. न्यायधिशाच्या पदावरील येणारी व्यक्ती हुषार, कुशील, बुद्धीमान, कायदेतज्ञ असल्या मुळे न्यायदान करताना कोणत्याहि दबावाला बळी न पडता स्वतःच्या बुद्धीने न्यायदान करतात.

iii) कार्यकालाची हमी :-

न्यायधिशपदी नियुक्त झालेल्या व्यक्तीला 65 व्या वर्षापर्यंत न्यायदान करते येते. त्यामुळे न्यायधिशांना या कार्यकालाची हमी मिळते. व ते निर्भिडपणे निपक्षपातीपणे कार्य करतात.

iv) आकर्षक वेतन :-

न्यायधिशांना कोणत्याहि मौल्यवान्च्या मोहाला बळी पडून न्यायदान करु नये. म्हणून त्यांना आकर्षक वेतन व इतर सुखसोई दिल्या जातात. एकदा निश्चित झालेले वेतन त्यांच्या कार्यकालात कपात केले जात नाही.

v) न्यायालयाच्या निर्णयावर टिका करता येत नाही :-

न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर कोणालाहि वृत्तपत्रातून, भाषणातून, लिखाणातून कोणत्याहि प्रकारची टिका / आरोप करता येत नाहि. एखादयाने केल्यास न्यायालयाचा अपमान समजून त्यास दंड दिला जातो. यामुळे न्यायधिश निर्णय देताना निर्भयपणे निर्णय देतात.

vi) शारीरिक संरक्षण :-

न्यायाधिशांना गुन्हेगार, दरोडेखोर, दहशतवादी च्या केससंदर्भात निर्णय दयावा लागतो. असे हे अट्टल गुन्हेगार न्यायधिशावर आक्रमण करतील धमकी देतील यासाठी न्यायधिशांना पूर्णपणे शारीरीक संरक्षण दिले जाते. न्यायधिशांसोबत पोलीस बंदोबस्त केला जातो. न्यायधिशांच्या कुटूंबाना संरक्षण दिले जाते या संरक्षणामुळे तो निर्भिडपणे न्यायदान करतो.

Scanned with CamScanner

vii) निवृत्तीनंतर व्यवसायबंदी :-

न्यायाधिशांना सेवानिवृत्ती नंतर संविधानानेच वकिलीचा व्यवसाय करण्यासाठी बंदी घातलेली आहे. कारण सेवानिवृत्त न्यायाधिशाने वकिली केल्यास न्यायाधिशावर दडपण आले असते. त्यामुळे निवृत्तीनंतर तर निवृत्तीनंतर वकिलीचा व्यवसाय करण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

८. अनेक घटकावरून न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधीत राहील्याचे दिसून येते.

## न्यायालयीन सक्रियता :-

i) प्रस्तावना :-

१९९० च्या दशकामध्ये (पासून) न्यायालयाची सक्रियता वाढलेली आहे. १९८० च्या दशकातील अस्तित्वात आलेल्या जनहित याचीकेच्या संकल्पनेतूनच न्यायालयीन सक्रियता ही संकल्पना पुढे आली. जनहित याचीकेच्या माध्यमातून अनेक घोटाळे उघडकिस आले व सत्ताधाऱ्यांच्या मग्रुरीला (मनमानीला) चाप बसला (आळा घातला) एखादयाने न्यायालयास साधे पोस्टकार्ड पाठवावे किंवा वृत्तपत्रातील प्रसिद्ध झालेल्या बातमीची न्यायालयानी दखल घ्यावी किंवा कोणीतरी त्या बातमीवरून जनहित याचीका दाखल करून सरकारला धारेवर धरावे यातूनच न्यायालयीन सक्रियता हा शब्द रूढ झाला. न्यायालयीन सक्रियतेचा पर्व सरन्यायाधिश पी. एन भगवती यांच्या काळ पासून सुरु झाला परंतू ऑर्थर स्लेसिंजर यांनी सर्वप्रथम न्यायालयीन सक्रियता हा शब्द वापरलेला दिसून येतो.

ii) न्यायालयीन सक्रियतेचा अर्थ :-

न्यायालयीन सक्रियता

Scanned with CamScanner